# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

(ISO 9001:2008 प्रमाणित)

पत्र पेटी क्र. - ५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२०

website : http://www.dteau.org email : roaurangabad@dtemaharashtra.gov.in

**<u>अतितात्काळ :</u>** जा.क्र.:तंशिविकाऔ/ITCell/EBC/२०१८/ ७४८

महत्वाचे : दिनांक : २८ फेब्रुवारी २०१८

प्रति

प्राचार्य

या कार्यालयाच्या अधिनस्त येणा-या सर्व संस्था

विषय : शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करिता राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेअंतर्गत सर्व पात्र विद्यार्थ्यांना लाभ देण्यासाठी संस्थास्तरावर तात्काळ कार्यवाही करणे बाबत.

संदर्भ : तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे पत्र.क्र. १८/तंशिस/विभा./कार्या.-पत्र/संकेतस्थळ-पत्र/ २०१८/६९, दि.२६-०२-२०१८.

या कार्यालयाच्या अधिनिस्त असलेल्या सर्व संस्थांना कळविण्यात येते की आपल्या संस्थेत राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेसाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांचे अर्ज दि.०३-०३-२०१८ पर्यंत DTE च्या वेबपोर्टलवर भरून घ्यावेत. (http://ebc2017.dtemaharashtra.gov.in/StaticPages/HomePage.aspx)

विद्यार्थ्यांना अर्ज भरतांना अडचणी येत असल्यास त्यांचे अर्ज संस्थेतर्फे सुविधा देऊन भरून घेण्यात यावेत. दि.०३-०३-२०१८ नंतर अर्ज भरण्यासाठी मुदतवाढ देण्यात येणार नाही.

संस्थेच्या लॉगीनमधील प्राप्त अर्जाची संस्थास्तरावर पडताळणी लवकरात लवकर दि.०५-०३-२०१८ पर्यंत पूर्ण करावी व विभागीय कार्यालयाला (RO) अर्ज फॉरवर्ड करावेत.

संस्थेचे अर्ज पडताळणीसाठी तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय औरंगाबादने निर्देशित केलेल्या वेळापत्रकाप्रमाणे दि.०५-०३-२०१८ ते दि.१४-०३-२०१८ या कालावधीत तपासून घ्यावेत व संपूर्ण प्रक्रिया दि.१५-०३-२०१८ पर्यंत पूर्ण करण्यासाठी सहकार्य करावे.

(महेश शिवणकर)

सहसंचालक

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय

औरंगाबाद

प्रत : मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांना माहितीस्तव सादर.